**Mumbai Metropolitan Region Development Authority (MMRDA) to Establish Two Metro Depots in Thane District**

**Mumbai, 10th August 2023:** The Mumbai Metropolitan Region Development Authority (MMRDA) has achieved a significant milestone in the expansion of its metro network by obtaining possession of crucial lands for the construction of two vital metro depots. The newly acquired land will facilitate the efficient operation, maintenance, and repair of metro trains for the citizens of Mumbai.

For Metro Line 12, which is set to connect Kalyan and Taloja, the government has transferred a total of 47 hectares of land located at Niljepada in Thane district to MMRDA. The Advance possession land was granted to MMRDA, marking a crucial step in the development of this metro route.

In addition, advanced possession of 59.65 hectares of land at Dongri Village (Bhayander West) has been received for the development of Metro Route 9 and 7A. This strategic move further enhances the metro network's reach within Thane district, benefiting the citizens with world-class transportation options.

The proactive support of the state government has been instrumental in expediting this land acquisition process. The roles played by Hon’ble Chief Minister Shri Eknathji Shinde, Hon'able Deputy Chief Minister Shri Devendra Fadanvis and Hon’ble Deputy chief Minister Shri Ajit Pawar, alongside the cooperation of the Thane district administration , have been pivotal in achieving this significant milestone. Their efforts have ensured the swift transfer of these lands, saving both costs and time for the completion of these critical infrastructure projects.

The ongoing construction of seven metro lines, namely Lines 2B, 4, 4A, 5, 6, 7A, and 9, is progressing steadily, with completion expected in the near future. The MMRDA is committed to providing additional and world-class transportation options for the citizens of the Mumbai Metropolitan Region. Currently, three metro lines are operational, bringing happiness to millions of Mumbaikars. The integration of metro depots, such as the ones being established in Thane district, is crucial for the successful implementation and maintenance of these metro lines.

Furthermore, MMRDA is actively working on expanding the metro network, with plans to connect Metro Route 12 (Kalyan-Taloja) to Metro Route 5 (Thane-Bhiwandi-Kalyan), enabling seamless travel between Thane and Navi Mumbai in a matter of minutes. The integration of Navi Mumbai Metro station with Metro Route 12 is being studied, promising enhanced connectivity for the region.

**"We are grateful for the cooperation of Hon'ble Chief Minister Shri Eknathji Shinde, Hon’ble DCM Shri Devendra Fadanvis, Hon’ble DCM Shri Ajit Pawar for**

**providing both the lands for the metro projects. At present, all the metro projects are progressing very fast and with the acquisition of these lands, the works will be completed soon. It is very important for its smooth operation, maintenance and repair of trains. Along with this, with the help of the state government, efforts are being made to transfer all the remaining proposed metro depots. We are studying the extension of Metro route 12 and its integration Navi Mumbai Metro station is proposed.",** said Dr. Sanjay Mukherjee, IAS, Metropolitan Commissioner of MMRDA.

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) ठाणे जिल्ह्यात उभारणार दोन मेट्रो डेपो**

**मुंबई, १० ऑगस्ट, २०२३:**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने दोन महत्त्वाच्या मेट्रो डेपोच्या बांधकामासाठी महत्त्वाच्या जमिनींचा ताबा मिळवून मेट्रो नेटवर्कच्या विस्तारात एक महत्वपूर्ण टप्पा गाठला आहे. नव्याने अधिग्रहित केलेल्या जमिनीमुळे मुंबईतील नागरिकांसाठी मेट्रो ट्रेनचे कार्यक्षम संचालन, देखभाल आणि दुरुस्ती सुलभ होईल.

मुंबई मेट्रो मार्ग- १२ च्या डेपो साठी ठाणे जिल्ह्यातील निळजेपाडा येथील ४७ हेक्टर जमीन शासनाने एमएमआरडीएला हस्तांतरित केली आहे. मौजे निळजेपाडा, ता. कल्याण, जि. ठाणे येथील सदर जमीन विनामूल्य असून भोगवटादार म्हणून एमएमआरडीएला देण्याचे आदेश जिल्हाधकाऱ्यांमार्फत निर्गमित करण्यात आलेले आहेत. त्यासोबतच श्री एकनाथजी शिंदे, मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये मेट्रो मार्ग ९ आणि ७ अ साठी मौजे डोंगरी येथील जागेचा आगाऊ ताबा देणेस मान्यता देण्यात आलेली होती, त्यानुसार मेट्रो मार्ग ९ आणि ७ अ साठी देखील मौजे डोंगरी येथील ५९.६३ हेक्टर जागेचा आगाऊ ताबा एमएमआरडीएला ठाणे जिल्हाधकाऱ्यांनी दिला आहे. या दोन्ही जागांमुळे ठाणे जिल्ह्यात दोन महत्वपूर्ण मेट्रो मार्गिकांसाठीचे डेपो आता उभारण्यात येणार आहेत जिथे मेट्रो गाड्या विसावू शकतील.

**राज्य शासनाची भूमिका ठरली महत्त्वाची**

राज्य शासनाने रितसर मान्यता प्रदान केलेल्या मेट्रो सारख्या निकडीच्या सार्वजनिक तसेच महत्त्वपूर्ण नागरी प्रकल्पांकरीता शासकीय जमीन आवश्यक असेल तेथे अश्या शासकीय भूखंड उपलब्ध नसेल तर प्रकल्पासाठी गायरान जमीनीचे परिवर्तन जमिनीचे भोगवटामुल्य कितीही असले तरी अटी व शर्तींना अधीन राहून संबंधित जिल्हाधिकारी त्यांच्या अधिकारांचा वापर करू शकतात. संबंधित जिल्हाधिकारी अशी जमीन राज्य शासनाच्या संबंधित विभागास महसूल मुक्त व सारा माफीने प्रदान करणेस सक्षम असते. त्या नुसार एमएमआरडीएला ठाणे जिल्हाधकाऱ्यांनी या जमिनी विनामूल्य हस्तांतरित केलेली आहे. या भूसंपादन प्रक्रियेला गती देण्यासाठी राज्य

सरकारचा सक्रिय पाठिंबा महत्त्वाचा ठरला आहे.  हा महत्त्वाचा टप्पा गाठण्यात माननीय मुख्यमंत्री श्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस आणि माननीय उपमुख्यमंत्री श्री अजित पवार यांनी ठाणे जिल्हा प्रशासनाच्या सहकार्यासह बजावलेली भूमिका महत्त्वपूर्ण ठरली आहे.  त्यांच्या प्रयत्नांमुळे या जमिनींचे जलद हस्तांतरण सुनिश्चित झाले आहे, ज्यामुळे या महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या पूर्ततेसाठी लागणारा खर्च आणि वेळ या दोन्हींची बचत होणार आहे.

मुंबई महानगर प्रदेशात एमएमआरडीएच्या माध्यमातून मेट्रोचे जाळे उभारण्याचे काम प्रगतीपथावर असून, निर्माणाधिन असलेल्या ७ मार्गिकांचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी प्राधिकरण प्रयत्नशील आहे. हे सर्व प्रकल्प महत्त्वपूर्ण नागरी प्रकल्प असून त्यांच्यामुळे नागरिकांना अतिरिक्त आणि जागतिक दर्जाची वाहतूक व्यवस्था मिळणार आहे. सध्या ३ मेट्रो मार्गिका कार्यान्वित असून त्यांच्यामुळे लाखो मुंबईकर रोज सुखावत आहेत. तर ७ मार्गिका प्रगतीपथावर आहेत. या सर्व मेट्रो मार्गिकांचे कार्यान्वयन आणि देखभाल दुरुस्तीसाठी मेट्रो डेपो हा प्रकल्पातील अविभाज्य घटक असल्याने त्यांची उभारणी देखील तितकीच महत्त्वाची असते.

मुंबई मेट्रो मार्ग २ब, ४, ४अ,५,६, ७अ आणि ९ यांची कामे प्रगतीपथावर असून ती लवकरच पूर्ण होतील.   मेट्रो मार्ग १० साठी विविध पर्यावरण विषयक परवानग्या मिळवण्यासाठी सल्लागाराची नेमणूक केली जात आहे, तर मेट्रो मार्ग १४  (कांजूरमार्ग ते बदलापूर) साठी सल्लागाराने मसुदा अंतिम अहवाल एमएमआरडीएकडे सादर केला आहे. या कॉरिडॉरचा सविस्तर प्रकल्प अहवाल आयआयटी मुंबईकडे पिअर रिव्ह्यूसाठी पाठवण्यात आला आहे. हा अहवाल प्राप्त झाल्यानंतर प्राधिकरणाच्या प्रशासकीय मान्यतेने घेऊन पुढील कार्यवाही केली जाईल. तसेच अगोदर २०.७ किमी लांबीच्या  प्रस्तावित असलेल्या मेट्रो मार्ग १२ च्या संरेखनचा विस्तार करून ती नवी मुंबई मेट्रो सोबत जोडण्यासाठीचा आवश्य तो अभ्यास सध्या सुरू असून त्या बाबत लवकरच निर्णय घेण्यात येईल. मेट्रो मार्ग १२ कल्याण तळोजा ही मार्गिका, मेट्रो मार्ग ५  ठाणे- भिवंडी- कल्याण या मर्गिकेसोबत जोडली जाणार आहे. असल्याने ठाणे ते नवीमुंबई प्रवास देखील काही मिनिटांत शक्य होणार आहे.

**"मेट्रो प्रकल्पांसाठी दोन्ही जमिनी उपलब्ध करून दिल्याबद्दल माननीय मुख्यमंत्री श्री एकनाथजी शिंदे , माननीय उपमुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस आणि माननीय उपमुख्यमंत्री श्री अजित पवार यांच्या सहकार्याबद्दल आम्ही आभारी आहोत.  सध्या सर्वच मेट्रो प्रकल्पांची कामे वेगाने सुरू असून  ही कामे लवकरच पूर्ण होतील. मेट्रो डेपो हे मेट्रो प्रकल्पांच्या उभारणीतील अविभाज्य घटक असतो, जो प्रकल्प पूर्ण होऊन त्याचे सुव्यवस्थित संचलन करणे, गाड्यांची देखभाल दुरूस्ती या साठी अत्यंत महत्त्वाचा ठरतो. त्यासोबतच राज्य शासनाच्या मदतीने उर्वरित प्रस्तावित असलेल्या सर्व मेट्रो डेपोसाठीच्या जागा हस्तांतरित करून घेण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.  मेट्रो मार्ग १२ च्या विस्ताराबाबत आम्ही अभ्यास करत असून तीचे नवी मुंबई मेट्रोच्या मेट्रो स्थानकासोबत एकत्रीकरण करण्याचे प्रस्तावित असून हे काम देखील लवकरच पूर्ण होणार आहे."** असे एमएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी, भा. प्र.से. म्हणाले.